अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भंडारा

27 JAN 2003

## आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

जुने जकात घर, दुसरा मजला, फोर्ट, मुंबई - २३

विषय : अपिल प्रकरणातील अंतीम निर्णयाअंती सामोपचार तसेच तडजोड शुल्क वसूली आदेशांचे अनुपालन बाबत.

परिपत्रक

क्र. एफएलआर सीएलआर ११२००३/सात मुंबई ८ जानेवारी २००३

अनुज्ञप्तीच्या ठिकाणी निरीक्षणा दरम्यान आढळलेल्या विसंगती तसेच अनुज्ञप्तीधारकाने नियमांच्या / अनुज्ञप्तीच्या अटींचा भंग केला असता किंवा इतर तत्सम बाबींमध्ये जिल्हाधिकाऱ्यांकडून ठोठावण्यात आलेल्या दंडाच्या आदेशा विरुध्द काही अनुज्ञप्तीधारक आयुक्तांसमोर अपिल दाखल करतात. सदर अपिलावर आयुक्तांचे निर्णयानुसार दंडाची रक्कम कमी, जास्त किंवा कायम करण्यात येते परंतु आयुक्तांचे असे निदर्शनास आले आहे की दंडाचे प्रकरणात जे अनुज्ञप्तीधारक आयुक्तांसमोर अपिलाते येतात व ज्या प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशास स्थगिती देण्यात आलेली नसतानाही असे अनुज्ञप्तीधारक अपिलावर सुनावणीच्या तारखेपर्यंत दंडाचा भरणा प्रलंबित ठेवतात. तरी अपिल दाखल केलेल्या तारखेपासून १० दिवसांचे आत स्थगिती आदेश प्राप्त न झाल्यास अश्या अनुज्ञप्तीधारकाकडून जिल्हाधिकाऱ्यांनी प्रस्तावित केलेला संपूर्ण दंड वसूल करण्यात यावा. तसेच आयुक्ताकडून अंतिम आदेश झालेल्या प्रकरणातील दंडाच्या रक्कमेची वसुली करण्यात येऊन त्याबाबतचा अनुपालन अहवाल प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेच्या आत या कार्यालनास सादर करावा. तसेच नियमभंगाचे / विसंगतीचे प्रकरण ३ महिन्यात निकाली निघेल याची दक्षता घ्यावी. अधीक्षकांनी सदर परिपत्रकाची पोच उलटटपाली द्यावी.

(ए. रामकृष्णन)
आयुक्त

प्रति

१. सर्व जिल्हाधिकारी यांना सस्नेह.
२. सर्व अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क
३. सर्व विभागीय उप आयुक्त राज्य उत्पादन शुल्क